स्वैच्छिक रक्तदात्यांसाठी ग्रीनकार्ड
योजना सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र.रक्तसं २००६/१४४/प्र.क्र.२५८/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१.८.२००६.

**वाचा :-** संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांचे क्र.रारसंप/रक्तदाता-ग्रीनकार्ड/०६/८५, दि.३ मार्च, २००६ चे पत्र.

**प्रस्तावना :-** राज्यात सद्यःस्थितीत सुमारे ७५% रक्तसंकलन स्वैच्छिक रक्तदानामधून होत असले तरी सुमारे २५% रक्तदान हे आजही बदली रक्तदात्यांमार्फत करण्यात येते. अनेक वेळा रुग्णांकडे नातेवाईक / मित्रमंडळी नसल्यास बदली रक्तदाता उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. अशावेळी संधीचा फायदा घेऊन धंदेवाईक रक्तदाते जे अतिजोखमीचे असतात, बदली रक्तदाता म्हणून पुढे येतात व सुरक्षित रक्तपुरवठा धोरणास घातक ठरतात. त्यामुळे बदली रक्तदाता टाळणे रुग्णाच्या हिताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. यास्तव स्वैच्छिक रक्तदानाला महत्व प्राप्त झाले आहे. स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना नियमितपणे रक्तदान करणेसाठी प्रोत्साहित करुन सुरक्षित रक्तपुरवठा करता येणे शक्य आहे. त्यासाठी शासकीय रुग्णालयातील रक्तपेढ्यांसाठी रक्तदान केल्यास त्या रक्तदात्यांना ग्रीनकार्ड देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

शासकीय रुग्णालयातील रक्तपेढीसाठी ज्या रक्तदात्यांनी किमान चार वेळा रक्तदान केले आहे अशा रक्तदात्यास ग्रीनकार्ड देण्यात यावे. या ग्रीनकार्डात अंतर्भूत करावयाची माहिती व कार्डाचा आकार इ.बाबत संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा. कार्डात अंतर्भूत करावयाची माहिती / कार्डाचा आकार निश्चित झाल्यानंतर विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन राज्यात एकाच पद्धतीने ही ग्रीनकार्डे वितरीत केली जावीत. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा शल्य चिकित्सक यांचेमार्फत या कार्डाचे वितरण करण्यात यावे. पुणे, मुंबई महानगर पालिका क्षेत्रात हे काम संबंधित शासकीय रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षकाकडे देण्यात यावे.

सदर ग्रीनकार्ड धारकांना खालीलप्रमाणे उपचारासाठी सुविधा देण्यात याव्यात.

१) सरकारी व निमसरकारी रुग्णालयात उपचारासाठी ग्रीनकार्ड धारक रक्तदात्यांना त्या रुग्णालयात उपलब्ध असणाऱ्या उपचाराच्या सर्व सुविधा त्यांना रांगेत उभे राहण्याची सक्ती न करता नियमानुसार अग्रक्रमाने देण्यात याव्यात.

२) ग्रीनकार्ड धारक रक्तदात्यांना रुग्णालयातील उपलब्ध असलेल्या सर्व तपासण्या व उपचार प्राधान्यक्रमांने विनाविलंब करुन देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सि.मं.इनामदार)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (पत्राने)

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, वडाळा, मुंबई.
प्रकल्प संचालक, एव्हर्ट सोसायटी, वडाळा, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
सर्व अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा.
सर्व सहसंचालक, आरोग्य सेवा.
सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा.
संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
सर्व उपसचिव, सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
खाजगी सचिव, मा.मंत्री (आरोग्य), मंत्रालय, मुंबई.
खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (आरोग्य), मंत्रालय, मुंबई.
सर्व अवर सचिव / कार्यासन अधिकारी, सा.आ.वि.,मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती आरोग्य-६